महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार.

## GOVERNMENT MEDICAL COLLEGE, NANDURBAR

जिल्हा सामान्य् रुग्णालय परिसर, साक्री रोड, नंदुरबार-४२५४१२.

Website –htpp://gmchnandurbar.com, Phon No.(02564) - 210444, ई-मेल:- deangmchnandurbar@gmail.com

जा.क्र.शावैमनं/बांधकाम/खाजगी इमारत भाडेतत्वावर/जाहिरात/ 819 /२०२२ दिनांक 8-3-22

## -: जाहिरात :-

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जिल्हा सामान्य रुग्णालय आवार, साक्री रोड, नंदुरबार येथे एम.बी.बी.एस. या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण घेणा-या ४०० विद्यार्थ्यांना त्यापैकी २०० मुले व २०० मलींकरिता असे एकुण ४०० विद्यार्थ्यांकरिता राहण्यासाठी विद्युत, पाणी व वाहनाकरिता पार्किंगची व्यवस्था इ. सर्व सोईयुक्त उपलब्ध असलेल्या व महाविद्यालयापासुन जवळ असलेले तसेच कमीत-कमी २ कि.मी.च्या अंतरावर असलेले इमारतीस प्राधान्य दिले जाईल. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार यांनी निर्धारित केलेल्या भाडयामध्ये (११) महिन्यांकरिता किंवा सदरील संस्थेचे पुढील आदेश होईपर्यंत अथवा नवीन इमारत भाडयाने घेईपर्यंत अथवा सदरील संस्थेची वसतिगृहाची नवीन इमारत तयार होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत इमारत भाडयाने करार तत्वावर घेणे आहे.

उक्त नमुद केल्याप्रमाणे नियमावलीत असलेल्या व भाडेतत्वावर घेण्यास इच्छुक असलेल्या इमारत मालकांनी अर्ज व आवश्यक त्या कागदपत्रासह या कार्यालयामध्ये दिनांक ३१.०३.२०२२ रोजीपर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावे. सदरील भाडेतत्तवावरील जागा उपलब्ध करुन देणेसंबंधी अटी व शर्ती इ.बाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

**अटी व शर्ती** :-

१) सदरील इमारतीमध्ये नियमित पुरेशा प्रमाणात शुध्द पिण्याचे पाणी व वापरण्याचे पाणी असावे.

२) विद्युत पुरवठयाची पुर्ण व्यवस्था असावी.

३) इमारतीच्या समोर पार्कींगसाठी पुरेशी जागा असावी.

४) इमारत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जिल्हा सामान्य रुग्णालय आवार, साक्री रोड, नंदुरबार शक्य तितक्या जवळ असावी. कमीत-कमी २ कि.मी. अंतरावर असल्यास त्यांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

५) इमारत (११) महिन्यांकरिता किंवा सदरील संस्थेचे पुढील आदेश होईपर्यंत अथवा नवीन इमारत भाडयाने घेईपर्यंत अथवा सदरील संस्थेची वसतिगृहाची नवीन इमारत तयार होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत इमारत भाडयाने करार तत्वावर घेणे आहे.

६) पाणी, विद्युत (शासकीय नियमाप्रमाणे विजेचे शुल्क वजा करुन) देयके या संस्थेमार्फत अदा करण्यात येतील.

७) इमारतीचे बांधकाम (१५) वर्षापुर्वीचे जुने नसावे.

८) इमारती संबंधीचे आवश्यक कागदपत्रे सादर करावित. (इमारतीचा मंजुर नकाशा, सातबारा उतारा, विद्युत देयक, नगरपालिका कर पावती. इ.)

९) वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या सुरक्षितेच्या दृष्टीने इमारत पुर्णतः सुरक्षित असावी.

१०) इमारतीचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार यांनी निर्धारित/ निश्चित केल्याप्रमाणे शासकीय नियमानुसार अदा करण्यात येईल.

११) इमारतीचे स्थानिक कर हे इमारत मालक यांना अदायगी करावे लागेल.

१२) इमारतीमध्ये विद्यार्थ्यांच्या भोजनाकरिता उपहारगृहाची स्वतंत्र व्यवस्था असावी.

१३) संस्थास्तरावर गठीत केलेल्या समितीद्वारे इमारतीचे संपुर्ण पाहणी करुन समितीच्या अहवालानुसार इमारत भाडयाने घेण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

१४) इमारत भाडयाने घेण्यासंबंधीचे आदेश निर्गमित करण्याचे अथवा प्रलंबित ठेवण्याचे अथवा कोणत्याही वेळी पुर्व सुचना न देता आदेश रद्य करण्याचे तसेच जाहिरात रद्य करण्याचे अधिकार अधिष्ठात, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार यांनी राखुन ठेवलेले आहे.

सदरील भाडे तत्वावरील जागा उपलब्ध करुन देण्या संबंधी अटी व शर्ती इत्यादी बाबतची माहिती संस्थेचे संकेतस्थळ Website : http://gmcnandurbar.com वर उपलब्ध आहे.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
नंदुरबार.